Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - B

## Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) B
ISSN : 2278-9308
March, 2021

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय संविधान आणि लिंगभाव असमानता | डॉ. अनिल व्ही. देशमुख | 1 |
| 2 | बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका : एक अभ्यास | डॉ. सुधाकर सोनोने | 5 |
| 3 | महिलांचे अधिकार : स्वरुप आणि वास्तविकता | डॉ. गणेश आर. गाडेकर | 9 |
| 4 | महिलांचे अधिकार : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ. विलास आघाव | 13 |
| 5 | भारतीय महिला आणि मुलींच्या शिक्षणासमोरील अडचणी | डॉ.अर्चना नारायण धर्मे | 17 |
| 6 | महिला सक्षमीकरण | प्रा. अरुण महादेव राख | 20 |
| 7 | मानवी हक्क आणि महिलांचे कर्तव्य | डॉ.अरविंद बा. पाटील | 24 |
| 8 | महिला सबलीकरण: संकल्पना आणि विविध पैलू | डॉ. बळीराम परशराम आवचार | 28 |
| 9 | मानवाधिकाराच्या कक्षेत महिलांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन | डॉ.चक्रधर ग. बागडे | 34 |
| 10 | पंचायतराज आणि महिला नेतृत्व | डॉ.भगवान गरुडे | 40 |
| 11 | समकालीन राजकारणातील स्त्रियांचा प्रश्न विशेष संदर्भ आरक्षण | प्रा. डॉ. भगवान लोखंडे | 43 |
| 12 | सार्वजनिक प्रशासनात स्त्रीयांची भूमिका : एक प्रशासकीय विश्लेषन | डॉ. प्रमोद चव्हाण | 48 |
| 13 | मानवी हक्क आणि वृध्द स्त्री | प्रा.डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण | 50 |
| 14 | महिला सक्षमीकरणाचा मुलाधार : डॉ.बि.आर. आंबेडकर | प्रा.डॉ. दत्ता कुंटेवाड | 52 |
| 16 | भारतीय राज्यघटना व महिलांचे अधिकार | प्रफुल ढोके | 56 |
| 17 | शैक्षणिक दृष्टीकोनातून पंचायतराज आणि महिला सक्षमीकरण | डॉ.दयाराम दुधाराम पवार | 60 |
| 18 | महिलां विषयक कायदे व अधिकार | प्रा.डॉ.कल्पना आर.टेकाडे | 64 |
| 19 | महिला आणि कौटुंबिक हिंसाचार | प्रा. डॉ. कविता ज्ञानेश्वर कावरे | 68 |
| 20 | महिलांचे मानवाधिकार | डॉ. विनोदकुमार सुकराम चोपकर | 72 |
| 21 | महिला सक्षमीकरणात बचतगटातील भूमिकेची समिक्षा | डॉ.प्रा.प्रशांत एम.पाटील | 77 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) B
ISSN : 2278-9308
March, 2021

# शैक्षणिक दृष्टीकोनातून पंचायतराज आणि महिला सक्षमीकरण

डॉ.दयाराम दुधाराम पवार
सहायक प्राध्यापक,शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

**प्रस्तावना :**

मानवाला जगण्यासाठी अन्न ,वस्त्र व निवारा ज्याप्रमाणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे शिक्षण देखिल महत्वाचे आहे . प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मानवाने विविध शोध व संशोधन केलेले आहे. शिक्षण हे मानवी जीवनाला आकार देण्याचे कार्य करते . व्यक्तीमत्व विकासासाठी शिक्षण हे महत्वपूर्ण साधन असून समाजाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण राहीलेली आहे . आपण सामाजिक परीवर्तनाचे द्वेतक महणून शिक्षणाकडे पाहतो. हे जरी खरे असले तरी सर्वांसाठी शिक्षण आवश्यक आहे .असे असले तरी महिलांसाठी शिक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे . आज म्हटल्याच जाते की मुलगी शिकली आणि प्रगती झाली . म्हणूनच आजची महिला ही शैक्षणिक , राजकीय ,सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेली दिसून येते. त्या आज उच्च पदावर विराजमान असलेल्याही दिसतात . शिक्षण घेणे हे स्त्री व पुरुष दोघांचेही हक्क आहे . शिक्षणाद्वारे समानतेच्या संधी उपलब्ध होतात . त्यासोबतच त्यांच्यामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या आयामाचा मापदंड म्हणून आपण शिक्षणाकडे पाहतो. प्राचिन काळाचा विचार केल्या महिलांना शिक्षणाचे दारे ही सिमित होती . परंतू जसा जसा विकासाच्या प्रवाहात येत गेले त्यानूसार कालखंडाप्रमाणे महिलांना शिक्षणाची द्वारे ही खुली होवू लागली.

महिला ही केवळ मर्यादीत क्षेत्रापूरतीच न राहता आज तिने तिच्या कर्तृत्वार भरारी घेतलेली आहे . त्यासाठी तिला शिक्षणाने संधी उपलब्ध करुन दिलेली आहे . आज महिला ह्या शिक्षणामुळे सर्वच क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने तर कधी पुढे आहेत .एवढे जरी असले तरी महिलांचा विकास होण्यासाठी शासनाने अस्तित्वात आणलेली पंचायत राज व्यवस्था ही खऱ्या अर्थाने महिलांना सशक्तीकरण व सक्षणीकरण करण्यास उपयूक्त ठरलेली आहे . त्यामुळे महिला सक्षमीकणाद्वारे महिलांना केवळ सामाजिक क्षेत्र ,शैक्षणिक क्षेत्रातच न थांबता राजकीय क्षेत्रात देखिल त्या प्रगती साधत आहे. त्यामुळे त्यांना सामाजिक व राजकीय तसेच आर्थिक सक्षण बनविण्यासाठी पंचायत राजच्या माध्यमातून व शिक्षणाचा आधार घेवून त्या प्रगती साधित आहेत .

भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहे . स्वतंत्र भारतामध्ये जिल्हा , तालुका , गाव पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थासाठी पंचायत राज ह्या संहितेचा वापर करण्यात येतो . महात्मा गांधी ह्यांच्या विकेंद्रीत सत्तेच्या कल्पनेवरुन विकेंद्रीत लोकशाहीच्या कल्पनेतून १९८५ नंतर पंचायत राज्याद्वारा ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांना सुरुवात झाली . महाराष्ट्र हे पंचायत राज स्विकारणारे देशातले नववे राज्य आहे .

राज्यातील पंचायत राज संस्था ह्या राज्याच्या ग्रामीण , निमशाही तसेच शहरी भागाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहेत . देशात तसेच राज्यात शासनाच्या अनेक विकास योजना ह्या पंचायत राज संस्थाच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविल्या जातात .

भारत सरकारनी ग्रामीण स्तरावर महिलांच्या सशक्तीकरण करण्याच्या दृष्टीने एक असाधारण पाऊल उचलले आहे . सरकारनी पंचायत राजमधील महिलांसाठीचे आरक्षण हे तेहत्तीस टक्के वरुन पन्नास टक्क्यावर आणण्याचा प्रस्तावाला मंजूरी दिलेली आहे . तसेच महिला आरक्षण वार्डाचा कार्यकाळ

वाढविण्यासाठीचाही प्रस्ताव दिलेला आहे . त्याद्वारे महिला प्रतिनिधींना त्यांचे सार्वजनिक काम आणि आपले नेतृत्व अधिक प्रबळ करण्याची संधी प्राप्त होईल . महाराष्ट्राने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याचा एक ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे राज्याच्या पंचायत राज संस्थामध्ये महिला प्रतिनिधींचे प्रमाणात लक्षणीय वाढ झालेली आहे ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने तसेच महिला सक्षणीकरण व सशक्तीकरणाच्या दृष्टीने महत्वाची आहे .

७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थाचे सदस्य व पदाधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्यात आमुलाग्र वाढ झालेली आहे . त्यात महिला अधिकाऱ्याच्या देखिल सहभाग आहे . केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविलेली असते . ग्रामपंचायतींना वेगवेगळे विकास योजनेअंतर्गत निधी मिळत असतो . त्या निधीचा विकास कामासाठी योग्य वापर करुन ग्रामसभेच्या माध्यमातून तसेच लोकसहभागातून ग्रामपंचायतीने तयार केलेल्या ग्रामविकास कृती आराखडयानूसार ग्रामविकास करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत जबाबदारी आहे . तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार विकास कामाकरीता जिल्हा परीषदांना निधी प्राप्त होत आहे . तसेच महिला आयोगाच्या शिफारशीमुळे विकास कामाकरीता जिल्हा परीषदांना निधी प्राप्त होतो . तेंव्हा ह्या बाबतीत पंचायत राज संस्थेतील महिला प्रतिनिधींनी जागृत राहून हा निधी योग्य कार्यासाठी खर्च होईल ह्याची दक्षता घेणे गरजेचे वाटते .

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी ह्यानी खेडयाकडे चला या संदेशाच्या अनुषंगाने केंद्र तसेच राज्य शासनानी ग्रामविकासाकडे अधिक लक्ष केंद्रीत केलेले आहे . त्या अनुषंगाने विविध योजना ग्रामीण भागात राबविल्या जातात . चौदाव्या वित्त आयोगाचा शंभर टक्के निधी प्रत्यक्ष ग्रामपंचायतींना मिळत आहे . त्यामुळे ग्रामीण भागाची वाटचाल विकासाकडे होतांना आपल्याला दिसून येते . ह्या योजने अंतर्गतच ग्रामीण भागातील किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी अस्मिता ही योजना राबविली जाते . तसेच महिला बचतगटातील उत्पादीत वस्तुंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळावी ह्या उद्देशाने महिला बचतगटाला शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते . त्यासाठी सुमतीबाई सुकळीकर महिला उद्योगीनी योजना राबविल्या जाते . अशा विविध योजनाद्वारे ग्रामविकासासाठी महिला सक्षमीकरणामध्ये मोठा हातभार लागलेला आहे . त्यामुळे अन्य राज्याच्या तुलनेने महाराष्ट्रातील महिलांमध्ये सकारात्मक बदल घडून आलेले दिसून येतात . शासनाच्या विविध योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी महिला प्रतिनिधींचा सक्रीय सहभाग होतांना आज दिसून येतो . स्थानिक पातळीवर महिलांचा सहभाग वाढविण्याकरीता तसेच पारंपारीक रुढी , परंपराना सोबत घेवून महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा देवून स्वताच्या पायावर राहावयास हवे . त्यामुळे महिला स्वताचा व्यक्तीमत्व विकास करतील तसेच त्या आत्मविश्वासाने स्वत राहू शकतील .आज मुलींचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेत कमी आहे ही एक चिंताजनक बाब आहे . ह्यासाठी पंचायत राजमधील महिला प्रतिनिधींनी आपल्या भागातील मुलींचे प्रमाणे वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशिल असले पाहीजे .

महिला आरक्षणामुळे काही महिला अनपेक्षितपणे घराण्याचा राजकीय वारसा चालविण्यासाठी राजकीय क्षेत्रात आणल्या जातात . तर काही ठिकाणी नागरीकांना आपली कामे पूर्ण करुन घेण्यासाठी सदर महिला प्रतिनिधींच्या जवळील व्यक्तींशी संपर्क करावा लागतो . कुठे कुठे महिला प्रतिनिधी नाममात्र असते व तिचे सर्व कार्य हे पुरुषच करीत असतो असे अनेक ग्रामीण , तालुका तसेच जिल्हा पातळीवर पहावयास मिळते . अशी परीस्थिती सर्वच महिलांच्या बाबतीत आहे असे नाही तर अनेक महिलांनी स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे आपल्या अधिकारांचा योग्य वापर करुन पुरुषांच्या बरोबरीने आपले राजकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे ही कौतुकास्पद बाब देखिल आहे .

समाजाच्या जडणघडणीत महिलांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाले पाहीजे . महिलांना सर्वच क्षेत्रात समान संधी प्राप्त झाली पाहीजे . ह्याच उद्देशाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत महिला सक्षमीकरणाचा जागर सुरु आहे . त्यात पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षणामुळे देशातील स्थानिक पातळीवर नेतृत्व निर्माण करण्यात महिलांना काही प्रमाणात यश प्राप्त झाले आहे . पंचायत राज द्वारे महिलांच्या राजकीय सक्षमीकरणास चालणा मिळाली . पंचायत राज अंतर्गत महिला लोकप्रतिनिधींची गरज लक्षात घेऊन ग्रामीण स्तरावरील महिला लोकप्रतिनिधींना राज्य महिला आयोगांच्या कार्याची ओळख करुन देणे , महिलांसाठी असलेल्या कायद्याचे आणि सरकारी आदेशाबद्दलची माहिती देणे , ग्रामपंचायत अर्थसंकल्प , शासन आदेश , ग्रामपंचायत च्या विविध योजना , पंचायत यंत्रणा , नवकल्पना आणि पंचायत राजमधील प्रयोग समजूण घेणे ह्या उद्देशाने राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कारभारणी प्रशिक्षण राबविण्यात येते . तसेच ह्या महिला प्रतिनिधींना लोकशाही तत्वाबाबत जागृक करण्यासाठी त्यांना कामकाजाचे प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून त्यांना २००७ मध्ये भारत सरकारने पंचायत राज मंत्रालयाने पंचायत राज महिला शक्ती अभियान हा कार्यक्रम सुरु केला .

पंचायत राज महिला शक्ती अभियानांतर्गत जिल्हा परीषद , पंचायत समीती व ग्रामपंचायत या तिनही स्तरावरील महिला प्रतिनिधी संघ देशात प्रथम महाराष्ट्र राज्याने स्थापित केलेला आहे . अशा प्रकारच्या महिला प्रतिनिधींना ह्या संघाच्या जबाबदाऱ्या , लैंगिक अन्याय , बालकाचे शोषण , अस्पृश्यता संबंधित बाबींकडे शासनाचा पाठपुरावा करणे तसेच त्याबाबत उचित कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करणे आणि महिला सबलीकरणाचा कृती आराखडा सादर करणे अशा विविध कार्याचा पाठपुरावा त्या महिलांच्या संघाद्वारे केला जातो . त्या महिलांच्या संघाच्या कार्यकारीणीची मुदत दोन वर्ष असते . तसेच दर तीन महिन्यात बैठका घेवून त्या संघाद्वारे योग्य ते कार्य पार पाडल्या जातात .महिला सक्षणीकरण व सशक्तीकरणासाठी मोलाचे कार्य ह्या महिला प्रतिनिधींद्वारे केल्या जातात .

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामाजिक परीवर्तन घडून आणण्याच्या दृष्टीकोनातून महिलांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून अनेक विकासात्मक कायदे अस्तित्वात आले आहे . महिला व पुरुषांना समानता तसेच विकास कार्यात महिलांचा सहभागाच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले . पंचायत राज्य व्यवस्थेत महिलांना आरक्षणाच्याद्वारे प्रतिनिधीत्व करण्याची संधी प्राप्त झाली . त्यामुळे महिलांच्या ग्रामीण विकासात पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासात सहभागी होण्याची संधी महिलांना मिळाली . त्यांच्या राजकीय नेतृत्वाला चालना मिळाली . महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेतील २,०३,२०२ प्रतिनिधीपैकी १,०१,[illegible] महिला प्रतिनिधी आहेत . स्थानिक स्वराज्य संस्थेत जरी महिलांचे प्रमाण तेहत्तीस टक्यावरुन पन्नास टक्के असले तरीही आजही भारतीय संसदेत आणि राज्य विधीमंडळातील विधानसभा व विधानपरीषदेत पाहीजे त्या प्रमाणात योग्य त्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळालेले नाही . संसदेतील महिला प्रतिनिधीमध्ये जागतिक तुलनेत भारत १३४ व्या स्थानावर आहे . मोफत शिक्षण , आरोग्य सुविधा , स्त्री भ्रूणहत्या कायदा , हुंडाबंदी कायदा तसेच संवैधानिक तरतुदी आदी बाबतीत महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अनेक कायदे अस्तित्वात आलेले आहे . त्यामुळे आजच्या महिला ह्या केवळ चूल आणि मूल एवढयावरच अवलंबून न राहता त्यांच्या कार्यक्षेत्रात वाढ झालेली आहे . त्यामुळे त्या आज आज गाव , तालुका, जिल्ह्याचे , राज्याचे नेत्तृत्व करु लागल्या आहेत . देशाला , राज्याला आणि गावाला विकासाकडे वाटचाल करण्यामागे ह्या महिलांना स्वनिर्णयाचा , नेत्तृत्व करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे . पंचायत राज मुळे महिलांना गावाचा कारभार चालविण्याची संधी मिळाली आहे . गावातील मुलभूत प्रश्नांची जाणीव अधिक

महिलांनाच असते . आता ही संधी मिळाल्यामुळे ग्रामविकासाच्या कार्यात महिला पुरुषापेक्षा मागे राहणार नाहीत हे नक्की. पंचायत राज व्यवस्थेद्वारे महिला आपल्या गावाला चांगली दिशा प्राप्त करुन देण्याच्या प्रयत्नात व त्यांच्या विकासासाठीच्या सक्षमीकरणास पंचायत राज चे योगदान मोलाचे राहीले आहे .

**संदर्भग्रंथ सूची :**

१. भागवत विद्युत , स्त्री परीवर्तनाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने : पुणे , प्रतिमा प्रकाशन .
२. पाटील एस.पी . संपादक (२०१६) मानव हक्काच्या माध्यमातून महिला सबलीकरणातील आव्हाने जळगाव , अथर्व प्रकाशन
३. देवळाणकर शेलेंद्र , समकालीन जागतिक राजकारण , प्रकाशन.
४. डोगरा भारत, (नोव्हेंबर २०१५) पंचायत राज के सामने आयी महिलाओं की नेतृत्व क्षमताएं : नई दिल्ली , कुरुक्षेत्र प्रकाशन विभाग सूचना एवं प्रसारण मंत्रालय भारत सरकार .
५. योजना मासिक , ( जून २०१२ ) स्त्री महिला सबलीकरण
६. www.miloonisaryajani.com
7 Sarita Brava , (Nov 2005) Women and Panchayat Raj System : New Delhi , Kurushetra Publication division, Soochna Bhawan Bharat Sarkar